# नाशिक महानगरपालिका, नाशिक

सामान्य प्रशासन विभाग

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक - 422002

जा.क्र.आस्था/वशि/कार्या-09/107/2026 दिनांक 29/06/2026

## -: प्रसिध्दीपत्रक :-

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क व गट-ड आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन संवर्गातील 186 रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी नामनपा जाहिरात क्र.02/2025, दि.04/11/2025 रोजी दैनिक वृत्तपत्रामध्ये आणि संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

शासन निर्णय क्रमांक : प्रानिमं 1222/ प्र.क्र.54/का.13-अ, दि.04 मे 2022 रोजीच्या शासन निर्णयान्वये कर्मचारी निवड समितीच्या निर्णयान्वये गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान 50% व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान 45% गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांना मैदानी चाचणी करीता पात्र ठरविणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दि.04/06/2026 रोजी मैदानी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्राथमिक यादी मनपा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदरील यादीवर काही आक्षेप प्राप्त झाले होते. तसेच पुन्हा तपासणी केल्यानंतर मैदानी चाचणी करीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी आज दि.29/06/2026 रोजी नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तसेच पात्र यादीमध्ये समाविष्ट उमेदवारांच्या मैदानी चाचणीचे वेळापत्रकाबाबत स्वतंत्र प्रसिध्दीपत्रक नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे पात्र उमेदवारांनी वेळोवेळी महानगरपालिकेच्या संकेतस्थळास भेट देऊन अद्ययावत माहितीची नोंद घ्यावी.

सही /-
मनिषा खत्री, भाप्रसे
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक